# लोककथा, लोककला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था

**प्रो. (डॉ.) शांताराम बबनराव चौधरी**
पद्मश्री विखे पाटील कला,
विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
प्रवरानगर. जिल्हा- अहिल्यानगर

## ❖ प्रस्तावना:

भारत अनेक लोकपरंपरेनी नटलेला देश आहे. पिढी दर पिढी या परंपरा काळासोबत पुढे चालत रहातात. या प्रवासात कधी सोयीनुसार बदल केले जातात तर कधी परिस्थितीमुळे नकळत घडत असतात. लोकसाहित्य हे लोकसमूहाच्या आविष्काराचे शास्त्र नाही तर लोकसमूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाचे ते शास्त्र असते.

कोणत्याही कालखंडातील लोकजीवनाचा अभ्यास करताना बदलती रूपे आणि बदलते संदर्भ यांसह लोकसाहित्याच्या आणि लोककलांच्या लोकसाहित्यशास्त्रीय अभ्यासाचे महत्त्व अनन्यसाधारण असते. कारण त्यातून लोकजीवन समग्रेतेने प्रकट होत असते. त्यात स्वाभाविकच आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक अशा सर्वच अंगांचा समावेश असतो. या सर्व अंगांचे दर्शन घडविण्याचे, निदान जीवन कसे होते किंवा आहे, याचे प्रत्ययकारी सूचन करण्याचे कार्य लोकसाहित्य आणि लोककला यांतून घडते. कोणताही नवा आक्रमक बदल किंवा क्रांतिकारक बदलदेखील लोकजवन प्रवाहाला उखडून टाकू शकत नाही; हे केवळ लोकसाहित्याच्या अभ्यासानेच स्पष्ट होऊ शकते. वर्तमानातील बदलते संदर्भ, लोकजीवनाचा आणि लोककलांचा अभ्यास म्हणजे गतगोष्टींचे जतन करण्याची धडपड, एवढ्या मर्यादित अर्थाने विचार करणे आत्मघातकीपणाचे ठरते. लोकजीवनाच्या आरंभबिंदूपासून लोकजीवन कालौघात कसे-कसे बदलत गेले, हे पाहण्यासाठी, स्वत्वाचे मूळ शोधण्यासाठी, गतगोष्टी जतन करणे, हे आवश्यकच काय परंतु अतिमहत्त्वाचे ठरते. त्याचबरोबर वर्तमानातील बदलत्या स्वरूपात गतजीवनाचे अवशेष कसे घट्टपणे प्रकट होतात, हे पाहणेही महत्त्वाचेच असते. समग्र पारंपरिक लोकजीवन शास्त्रांच्या व कलांच्या अवस्थांतरांसह समजून घेण्याचाच तो खटाटोप असतो.

लोकसाहित्य व लोककला यांचे हे स्वरूप लक्षात घेऊन आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडण प्रक्रियेत लोकसाहित्य विशारद, लोककलावंत, लोकसाहित्य व लोककला या संदर्भातील कार्य करणाऱ्या संस्था, शासकीय प्रयत्न या सर्व गोष्टींचा साक्षेपाने परिचय करून घेणे योग्य होईल.

महाराष्ट्र राज्याला भूगोल आहे आणि इतिहाससुद्धा! गौरवशाली इतिहासाची परंपरा आपणास प्राचीन कालखंडात दिसते. मध्ययुगात सर्व भारतभर परकीय आक्रमणाचे ढग दाटून आलेले होते. या नैराश्यपूर्ण मळभावर विजयनगरचे साम्राज्य आणि स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे अपवाद आपणास दिसून येतात. मराठी सत्तेच्या पतनानंतर इंग्रजांचा अंमल महाराष्ट्रावर सुरू झाला. इंग्रजांविरुद्धच्या संघर्षात आद्य क्रांतिकारकांपासून ते सर्वसामान्य माणसांपर्यंत अनेकांनी बलिदान केले आणि हा देश स्वतंत्र झाला. १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाल्यावर महाराष्ट्राला पुन्हा एकदा भाषिक राज्यासाठी लढा द्यावा लागला. १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले. अर्थात बेळगाव वगळून! १९६० ते आजतागायत स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

लोककथा, लोककला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था या तीन गोष्टी एकमेकांशी घट्ट निगडित आहेत. याचा अभ्यास केल्यास आपल्याला आपल्या सांस्कृतिक परंपरांचा, सामाजिक संरचनेचा आणि अर्थशास्त्र यांचे एक सुसंगत चित्र मिळते. या तीन गोष्टींचा परस्पर संबंध दर्शवितो की; आपले गावांचे जीवन फक्त रचनात्मकतेमध्येच नाही तर आर्थिक दृष्टिकोनातूनही कसे समृद्ध होते हे दिसून येते.

## **१. लोककथा**

लोककथा म्हणजे केवळ मनोरंजनाचे साधन नव्हे; तर त्या कथा समाजाच्या प्राचीन परंपरांची, धार्मिक विश्वासांची, मूल्यांची आणि मानवी संवेदनांचा एक आरसा आहेत. यामध्ये आदिवासी लोककथा, ग्रामीण क्षेत्रातील कथा, धार्मिक कथांसोबतच अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो ज्या त्या कथेच्या रूपाने लोकांपर्यंत पोहचतात.

लोककथा साधारणतः पीढी दर पीढी वळण घेत, शब्दांकन न करता सांगितल्या जातात. यामध्ये गोड गोष्टी, देव-देवते, दुष्ट राक्षस, नायक-नायिका आणि शहाणपण अशा विविध पात्रांचा समावेश असतो. लोककथा म्हणजे आपल्या सांस्कृतिक अस्तित्वाची एक लक्षणीय परंपरा. "वाचली" गेलेल्या कथा म्हणजे केवळ धार्मिक, नैतिक किंवा राजकीय शिकवण देणारीच नसून त्या कथेतील लोकांचे दु:ख, आशा, आकांक्षा आणि जीवनाची संघर्षकथा दिसून येते.

उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील "राजा शिवछत्रपती" किंवा "संत तुकाराम" यांच्या कथेतील घटनांमधून, लोक त्यातून प्रेरणा आणि मार्गदर्शन मिळवतात. यामुळे एक सामाजिक संरचना

मजबूत होण्यास मदत होते. लोककथा ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या वाढीस देखील कारणीभूत ठरतात कारण त्या त्या भागातील लोकांचे जीवन व व्यवसाय यांचे चित्रण करत.

## २. लोककला

लोककला हा एक अत्यंत महत्त्वाचा सांस्कृतिक घटक आहे. भारतातील प्रत्येक प्रांत, राज्य, आदिवासी समूह, आणि भौगोलिक क्षेत्र यांचे आपलेच वेगळे कला रूप, कलेचे प्रकार आणि त्यांचे हस्तकौशल्य असतात. लोककला म्हणजे लोकांच्या जीवनातील अवयवांचे रंग, त्यांच्या रीती-रिवाजांचे चित्रण, त्यांच्या आस्थांचा उलगडा करणे. यामध्ये चित्रकला, शिल्पकला, नृत्यकला, संगीत, नाटक इत्यादींचा समावेश होतो. लोककला ह्या केवळ कला म्हणूनच नाही, तर त्या सामाजिकतेचे प्रतीक, लोकजीवनाचे आरंभ आणि विकासाचे लक्षण आहेत.

जसे की 'पंढरपूरची वारी', 'काठी पिळवणी', 'संत तुकारामाची अभंग गाणी', 'गोंधळ', 'लावणी' इत्यादी लोककला रूपांमधून एक सुसंस्कृत जीवनशैली प्रकट होते. या कलेमध्ये धारा, रीती आणि परंपरा पिढ्यानपिढ्या जातात. यामुळे लोककलेचा वापर लोकांची एकात्मता, विश्वास, आणि परंपरा मजबूत करण्यासाठी होतो.

लोककला ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे. काही कलेचे प्रकार त्या क्षेत्रातील एक प्रमुख उत्पन्न स्रोत बनतात. उदाहरणार्थ, "पल्हाळी", "रांगोळी", "वडवणी", "हातमाग" अशा कला तेथे व्यावसायिक स्वरूप घेतात. यामुळे त्या स्थानिक कलेचे आणि कलाकारांचे उत्पन्न वाढवतात. त्याशिवाय, ह्या कलेच्या माध्यमातून पर्यटकांना आकर्षित करून स्थानिक समुदायाला आर्थिक लाभ होतो.

## ३. ग्रामीण अर्थव्यवस्था

ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणजे ग्रामस्थांच्या जीवनाचे आणि रोजगाराचे संदर्भ घेणारी आर्थिक रचना. भारताच्या ग्रामीण भागात बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून असतात. पण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अवलंब फक्त शेतीवरच नसतो. तर त्यात हस्तकला, उद्योगधंदे, पारंपरिक कारागिरी आणि छोटे धंदे यांचा समावेश होतो.

ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये पिकांच्या उत्पादनापासून ते तेथे तयार होणाऱ्या विविध कलेवर आधारित उत्पादने यांचे महत्त्व आहे. उदाहरणार्थ, माहेश्वर येथील वस्त्र निर्मिती, काशी येथील रेशीम वस्त्रनिर्मिती, किंवा कर्नाटकमधील हस्तकला अशा प्रकारच्या व्यवसायांमुळे अनेक कुटुंबे आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होतात.

लोककला आणि लोककथांमध्ये आपल्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कर्तव्यांचा समावेश असतो. लोककला आणि लोककथांमुळे ग्रामीण समाजाची मानसिकता, त्यांची नैतिकता, कलेवरील विश्वास आणि त्यांचे सामाजिक बंधन दृढ होतात. यामुळे त्या भागातील लोकांचे आर्थिक जीवन सुधारणारे, स्थानिक व्यवसायांना प्रोत्साहन देणारे आणि त्या क्षेत्रातील विविध प्रकल्पांना चांगला प्रतिसाद मिळवणारे ठरते.

## ४. लोककथा, लोककला आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा परस्पर संबंध

लोककथा, लोककला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था एकमेकांच्या पर्यायी नसून एकमेकांच्या पूरक आहेत. लोककथा सांस्कृतिक परंपरांचे प्रतिनिधित्व करतात, तर लोककला त्या परंपरांचा कलेच्या रूपात परिष्कृत रूप आहे. दोन्ही एकमेकांना जोडत असताना ग्रामीण अर्थव्यवस्था हे त्या सर्वांचा आर्थिक पाया आहे.

लोककथांमधून लोकांच्या कष्टकरी जीवनाचे प्रतिबिंब दिसते. आणि लोककलेतून त्या जीवनाची विविधता प्रकट होते. या साऱ्या घटकांचा एकत्रितपणे विचार केल्यास आपल्याला कळते की; लोककथा आणि लोककला केवळ सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वाची नाहीत, तर त्या - त्या समाजाच्या अर्थशास्त्रावरही प्रभाव टाकतात.

## लोककला

❖ **प्राचीन महाराष्ट्र :**

महाराष्ट्राची म्हणून एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आहे. संस्कृती म्हणजे जगण्यासाठीची मूल्ये, आचरणाचे नियम, रूढी, चाली-रीती, व्यवहार, आपली भाषा, सण, उत्सव, इतिहास, भौगोलिक परिस्थिती, थोर व्यक्ती, परंपरा यांतून संस्कृती प्रत्येक नव्या पिढीकडे पोहोचते. बदलत्या काळाप्रमाणे येणाऱ्या पिढीला त्यात काही फेरफार करावे लागतात, पण वागण्याचे नियम-मूल्ये यात मात्र मोठे बदल होत नाहीत. सण-उत्सव, प्रथा, परंपरा या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला वारशाने समजतात. त्याविषयीचे वाचन, अभ्यास औपचारिकपणे सर्व जण करत नसले, तरी मौखिक परंपरेने, अनुकरणाने, निरीक्षणाने त्या वर्षानुवर्षे सुरूच राहतात.

## ❖ मध्ययुगीन महाराष्ट्र :

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाची सुरुवात आपणास रामदेवराय यादव यांच्या कालखंडापासून करावी लागते. दिल्लीचा सुलतान अलाउद्दिन खलजी याने यादवांच्या अफाट संपत्तीविषयी ऐकले होते. ही संपत्ती लुटणे, आपल्या सत्तेची दक्षिणेत ठाणी उभारणे, सत्तेचा

विस्तार करणे या कारणांसाठी अलाउद्दिनने महाराष्ट्रातील यादव सत्तेच्या प्रमुख केंद्रावर म्हणजे देवगिरीवर (सध्याचे दौलताबाद) हल्ला केला. राजा रामचंद्र यादव याच्याकडून अलाउद्दिनला फारसा तिखट प्रतिकार झाला नाही. यादवांनी पुढे प्रतिकार करण्याचा प्रयत्न करताच अलाउद्दिनचा सेनापती मलिक काफूरने यादवांचा वेळोवेळी पराभव केला. रामदेवराव उर्फ राजा रामचंद्रनंतर त्यांचा मुलगा शंकरदेव व जावई हरपालदेव हे यादव सत्तेचे प्रमुख झाले परंतु या दोघांनाही महाराष्ट्राला लागलेले परकीय सत्तेचे ग्रहण संपविता आले नाही. दक्षिणेवर आक्रमण करणारा पहिला सुलतान म्हणून अलाउद्दिनचे नाव इतिहासात अजरामर झाले. संपूर्ण यादव राज्याचा नाश इ. स. १३१८ च्या सुमारास झाला. म्हणजे आजपासून (२००८ पासून) बरोबर ६९० वर्षांपूर्वी हे रामायण घडले. खलजीच्या विरोधात महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेने काय प्रतिक्रिया दिली याचे पुरावे इतिहासाला अज्ञात आहेत. सर्वसामान्यांच्या प्रतिक्रियांची दखल घेण्याइतपत इतिहासलेखनाचा प्रवास प्रगल्भ व्हायचा होता.

## ❖ संतांची कामगिरी :

‘मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष’ या ग्रंथात न्या. महादेव गोविंद रानडे यांनी संतांच्या भूमिकेविषयी पुढील भाष्य केले आहे. ‘‘जातीजातीतील विषमता कमी करून संतांनी महाराष्ट्राची भूमी ऐक्यभावनेने नांगरून तयार केली. **त्यानंतरच छत्रपती शिवाजी महाराजांना** त्यात स्वातंत्र्याचे बी पेरणे शक्य झाले.’’ खरं म्हणजे महाराष्ट्राची प्रादेशिक अस्मिता व देशी भाषेतील विचारधन यांची निर्मिती संतांनी प्रवर्तित केलेल्या भक्तिपंथाकडूनच झाली असल्याचे दिसून येते. त्यामुळे मराठी संत हेच महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्रमुख शिल्पकार ठरतात. धर्माचे रहस्य समजावून देऊन संतांनी उच्च व उदात्त विचार, कृती यांवर भर दिला. महाराष्ट्रात संत परंपरेचा उदय तेराव्या शतकात झाला. या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात लोकभाषांमधून भक्तिमार्गाचा प्रसार करणारे भागवतधर्मीय संत पुढे आले. परमेश्वर प्राप्तीसाठी उत्कट भक्तीखेरीज दुसऱ्या कशाचीच जरुरी नाही, त्यामुळे कुलजातिवर्णादी विषमतेला, स्त्री-पुरुष भेदाला किंवा विद्या, धन, प्रतिष्ठा इत्यादींमुळे प्राप्त होणाऱ्या अधिकारभेदाला भागवतधर्मात बिलकुल थारा नाही, असे प्रतिपादन संतांनी केले. नाथपंथ, महानुभाव, वारकरी पंथ यांनी महाराष्ट्राला जागे केले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नरहरी सोनार, संत गोरा कुंभार, संत सेना महाराज, संत रोहिदास व कनकदास, कान्होपात्रा, जनाबाई, चोखामेळा आदी संतांनी महाराष्ट्रात लोकजागृती केली.

❖ **लोककला हे महाराष्ट्रानं जतन केलेलं मौल्यवान ऐश्वर्य :**

ग्रामीण महाराष्ट्रात मनोरंजनासाठी आणि प्रबोधनासाठी या लोककलांचा जन्म झाला. तशाच काही लोककला या धार्मिक व आध्यात्मिक श्रद्धांशीही निगडीत आहेत. आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या दुर्बल समाजाला जेव्हा शिक्षणाचा आधार नव्हता, तेव्हा या लोककलांनी त्यांचे प्रबोधन केले, आजारांवर झाडपाल्यांची औषधे सांगीतली आणि ईश्वराच्या आधाराने जगण्यावरची श्रद्धा वृद्धिंगत केली. लोकश्रद्धेतून जन्मलेल्या व लोकशिक्षणासाठी अखंडपणे चालत आलेल्या या लोककला आजही ग्रामीण जीवनासाठीच नव्हे तर मराठी संस्कृतीपासून काहीशा दुरावत चाललेल्या शहरी संस्कृतीसाठीही गरजेच्या आहेत.

महाराष्ट्राची जडणघडण करण्यात या लोककलांचा मोठा वाटा आहे. प्रबोधनापासून ते मनोरंजनापर्यंत प्रत्येक पातळीवर समाजमनास आकार देण्याचा प्रामाणिक प्रयत्न लोककलांनी केला म्हणूनच आज आपण म्हणू शकतो की, महाराष्ट्र म्हणजे सप्तसुरांचा संगम आणि सप्तरंगांची उधळण आहे. इथे मनातला गुंता शेजारीण सोडवू शकत नाही, पण वर्षातून एकदा येणारी कडकलक्ष्मी सगळ्या रोगांवर औषध देऊन जाते. ज्वारीच्या शेतातून कुणी चालू लागला, तर कधी कडाक्याच भांडण होतं, पण मोरपिसाची टोपी घातलेल्या वासुदेवाच्या झोळीत सूपभर जोंधळे आनंदानं घातले जातात. कधी स्वतःच्या पणजोबाचं नावं आम्हाला माहिती नाही, पण वर्षातून एकदा येणारा हेळवी आमच्या पणजोबाचा खापर पणजोबा कुठे राहायचा हे पत्त्यासहीत सांगतो. खरा पोलीस गावात कधी येतो की नाही हे माहीत नाही, पण बहुरूपी आला की पोरं-सोरं डालग्यामागं गुडूप होतात. ब्रह्मदेवानं गाठ मारली म्हणून लग्न होतं, पण गोंधळ्यानं गोंधळ घातल्याशिवाय संसार सुरू होत नाही. आम्ही मूल व्हावं म्हणून नवस बोलतो, पण मूल झालं की ते देवाला सोडतो. आमचा अर्धा गाव कीर्तनात दंगलेला असतो, तर अर्धा गाव तमाशात रंगलेला असतो. गळ्यात माळ घालून काही लोक पंढरीची वाट चालतात, तर काही म्हसोबाला बोकड कापून स्वतःच त्यावर ताव मारतात. जसा आहे तसा, पण आपला महाराष्ट्र रंग-ढंगदार आणि नवरसपूर्ण आहे.

❖ **जात्यावरच्या ओव्या** :

ओवी हा एक काव्यप्रकार असून भागवत संप्रदायी संतांच्या अनेक रचनांमध्ये ओवीबध्द रचना आढळतात. ओव्या या दोन चरणी, चार चरणी अथवा सहा चरणीही असतात. जानपद गीतांच्या अंतर्गत मौखिक वाङ्मय म्हणून ये**णा**%yaa ओव्या म्हणजे लोकसंस्कृती आणि या लोकसंस्कृतीतील लोकमानसाचा आरसाच होय. जात्यावरच्या ओव्या म्हणजे कुटुंबवत्सल स्त्रियांच्या भावभावनांचे विरेचन! संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या अभंग

रचना या ओवीबध्द रचना म्हणून प्रसिध्द आहेत. श्रीधरपंतांच्या पोथ्यादेखील ओवीबध्द रचनेसाठी प्रसिध्द आहेत. या पोथ्यांचे अथवा अभंगांचे संस्कार जात्यावरच्या ओव्यांवर झालेले आहे. रामजन्माच्या एका अभंगात एक उल्लेख आहे तो असा-

राम वेळोवेळी आम्ही गावू ओवियेे
दळिता कांडिता जेवितांना बाई ये।

म्हणजे ओव्यांचा संबंध थेट श्रमांशी आहे. श्रम हलके करण्यासाठी ओव्या हे सूत्र लोकसंस्कृतीत दिसते. अलीकडच्या काळात महाराष्ट्राच्या लोककलांचे दर्शन घडविणा%yaa विविध कार्यक्रमांमध्ये जात्यावरच्या ओव्या हा एक सादरीकरण प्रकार म्हणून प्रतिष्ठित झालेला असला तरी मूळ जात्यावरच्या ओव्यांचा संबंध ग्रामसंस्कृतीशी आणि ग्रामसंस्कृतीतील एकत्र कुटुंबपध्दतींशी (ज्याला रूढ भाषेत खटल्याचं घर असं म्हणतात) आहे.

❖ 1. **वासुदेव :**

'गोविंद रामा हो, गोपाळा रामा जी जी
केशवा रामा हो, माधवा रामा जी जी'

सूर्यप्रकाश चंद्रप्रकाशात मिसळताना पक्षांची घरटी किलबिलू लागतात, त्यांच्यासोबत, तालासुरात, टाळ-चिपळ्यांच्या तालावर वासुदेव मनाचा ताबा घेतो आणि बाळ गोपाळांचा मेळा अंथरुणातून थेट अंगणात येतो. डोक्यावर मोरपिसांनी सजविलेला शंकुच्या आकाराचा मुकुट, अंगात शुभ्र घोळदार झब्बा, सलवार आणि कमरेला बांधलेलं उपरणं. उपरण्यात खोवलेला पावा. एका हातात टाळ, एका हातात चिपळ्या आणि पहाटेचं वातावरण भारून टाकणा**%yaa** आवाजाला पायात बांधलेल्या चाळांची साथ. पाहताक्षणी लहान-थोरांना भुरळ घालण्याची किमया त्याच्या या पेहरावात असते.

❖ २. **बहुरूपी :**

भर दुपारी उन्हातान्हात राबण्यापेक्षा थोडा विसावा घ्यावा म्हणून कुणी सोप्यात, ओसरीवर कलंडलेला असतो, तर घरातलं महिला मंडळ धान्य निवडण्यात किंवा इतर कामात मग्न असतं. ग्रामीण भागात दिसणारं हे नेहमीचं चित्र. पण वर्षातल्या एखाद्या दिवशी दुपारच्या या मंदावलेल्या वेळेची तारांबळा उडून जाते. ध्यानी मनी नसताना कानावर खणखणीत आवाज पडतो.

'पाटील...कुठायत पाटील, असली करणी करून वर उन्हातान्हाचे सावलीत झोपता.

’पहिल्यांदा बाया-बापड्या गोंधळून जातात, पोरं घाबरून जातात. पण आवाज देणाऱ्याचा अवतार बघून त्यांच्या लक्षात येतं की हा तर बहुरूपी आहे.
अंगात पोलिसाचा वेश, पण खिशाला लाल, काळा, हिरवा, निळा, खटक्याचा, मोडलेला असे दहा -बारा पेन अडकवलेले. डोक्यावर एक काच नसलेला काळ्या फ्रेमचा चष्मा. पायात फाटलेले बूट, बंदात अडकविलेली, कधीही न वाजणारी शिट्टी आणि काखेला जुनाट विटकी डायरी. अशा वेशातला बहुरूपी पोलीस वर्षातून एकदातरी गावात येतोच येतो. आला की ज्याच्या घरासमोर असेल, त्या घरच्या पुरुषावर वारंट बजावतो. त्याच्या बायकोला खरं गुपित सांगतो. खळखळून हसणाऱ्या बाया-बापड्या क्षणभर कामाच्या रामरगाड्यातून बाहेर येतात. त्यांच्या या मोकळेपणानं हसण्याचं श्रेय घेतानाच हा बहुरूपी आपली खाकी पिशवी पुढं करतो. मग कुणी धान्य, कुणी वस्तू , तर कुणी पैसे देतात आणि पुढच्या दारावर नव सोंग घेऊन, नव्या उत्साहात तो निघून जातो.

### ❖ ३. गोंधळ :

महाराष्ट्रातील बहुतांश समाजांचा कुळधर्म-कुळाचार असणारी एक प्रबोधक, मनोरंजक आणि महत्त्वपूर्ण परंपरा म्हणजे गोंधळ. लग्न, मुंज किंवा इतर शुभकार्याविळी घरी 'गोंधळ' घातला की आयुष्याचा गोंधळ होत नाही अशी धारणा आहे. श्री रेणुका मातेचा किंवा श्री तुळजाभवानीचा आशीर्वाद लाभावा यासाठी भाविक-भक्त आपल्या पारंपरिक घराण्यातील गोंधळ्याला बोलावून देवीचा यथासांग गोंधळ घालतात. महाराष्ट्रात ज्या लोककलांना लोकजीवनाचा अविभाज्य घटक बनता आलं, त्यापैकी ही एक महत्त्वाची कला होय.गोंधळाची उत्पत्ती ही परशुरामांनी केलेल्या मातृवंदनातून झाली असे सांगितले जाते. त्याबद्दल अशी कथा आहे की, परशुरामांनी बेटासूर नावाच्या दैत्याचा वध करून त्याचे शिर कापले. त्याच्याच शरीरातील शिरा (नसा) कापून, शिराच्या (कवटीच्या) ब्रह्म रंध्रात ओवून त्या वाद्याचा ‘तिंतृण तिंतृण’ असा आवाज करीत तो माता रेणुकेजवळ आला व तिला वंदन केले. या वंदनातून**च** गोंधळाचा उगम झाला. असे अभ्यासक लिहितात. तर गोंधळी लोक जमदग्नी ऋषी व रेणुका माता यांपासून आपली उत्पत्ती झाली आणि माहूर हे आपले मूळ स्थान आहे असे मानतात. काही संशोधकांनी गोंधळ ही कला भूतमाता व तिच्या भक्तांशी संबंधित असल्याचंही साधार स्पष्ट केलं आहे.
गोंधळाची प्राचीनता मांडताना संशोधकांनी- श्री. तुळजाभवानीची प्राचीनता ही इ. स. १००० पूर्वी जाते व रेणुका माता त्याहून प्राचीन आहेत, आणि गोंधळाची प्राचीनता रेणुका मातांच्या प्राचीनतेशी निगडीत आहे असे नमूद केले आहे. तर समर्थ रामदासांनी रचलेल्या, गोंधळात

गायल्या जाणा%yaa आरतीत 'कवडी' एक अर्पिता देसी हार मुक्ताफळा वो' या ओळीतील कवडी या चलनाचा संदर्भ येतो. 'कवडी' हे चलन पाचव्या शतकाच्या दरम्यान कर्नाटकात प्रचलित होते. त्या वेळचे कर्नाटकातील कदंब राजघराणे हे श्री तुळजाभवानीला आपली कुलदेवी मानत होते व उत्सव, गोंधळात सहभागी होत होते. यावरून गोंधळ प्रथा तेव्हापासून प्रचलित असावी असाही संदर्भ दिला जातो. शतकानुशतके भक्तिभावाने घातल्या जाणा%yaa या गोंधळाचे स्वरूप बदलत्या काळासोबत सकारात्मक व नकारात्मकदृष्ट्याही बदलत आले आहे. भाविकाच्या घरी गोंधळ घालण्यासाठी येणा%yaa गोंधळ्यांच्या पिढ्या काळासोबत ज्ञानात वाढ व सादरीकरणात बदल करत राहिल्याने काही दशकांपूर्वीचा गोंधळ वेगळा होता असे वाटून जाते.

❖ **४. पोतराज :**

आलीया मरिबाई,
तिचा कळेना अनुभऊ
भल्या-भल्यांचा घेती जीवू,
आलीया मरिबाई.

वर्षभरात एकदातरी ढोलक्याचा तालबद्ध आवाज, त्यावर वाजणारी घुंगरं आणि आसुडाचे कडाडणारे फटके कानावर पडतातच. हा थोडासा भयावह वाटणारा गोंधळ कानी आला की, गावातल्या आयाबाया हातात धान्याचं सूप किंवा खण-नारळ घेऊन लगबगीनं बाहेर येतात. मरिआईचं देणं चुकवलं की, भयंकर परिणामांना सामोरं जावं लागतं ही धारणा आजही तितकीच पक्की आहे. त्यामुळं पोतराज गावात आला की, महिला वर्ग न चुकता हळदी कुंकू वाहायला मरिआईच्या गाड्याभोवती जमा होतात. लहान मुलांना आजारातून बरं करण्यासाठी, जनावरांच्या रक्षणासाठी, घरात शांतता नांदण्यासाठी मरिआईला नवस बोलला जातो. ग्रामीण भागातल्या महिलांची या देवीवर गाढ श्रद्धा आहे. तिच्या सेवेत कमी पडल्यास, तिच्या देण्यात कसूर झाल्यास ती भक्ताला जीवघेणी शिक्षा देते, जीव घेण्यासही कमी करत नाही. एवढी ती कडक आहे असे मानले जाते. म्हणूनच तिला कडकलक्ष्मी असे संबोधले जाते. ती आपल्या भक्तांना नेहमी सुखात ठेवते, पण त्यासाठी पाळावयाची पथ्ये इतर देवी-देवतांच्या पथ्यांपेक्षा कडक आहेत.

❖ **५. भुत्या :**

भवानी, मी तुझा भुत्या खरा।।धृ।।
अनुहात -चौंडके वाजत डुगडुग।

होतो घोष बरा।।१।।
बोधाची परडी, ज्ञानाचा संबळ।
अज्ञान तो पोत खरा।।२।।
एका जनार्दनी भुत्या मी जालों।
तुझे पायी मी खरा।।३।।

संत एकनाथांच्या या अभंगातून भुत्याची श्री जगदंबेवरची श्रद्धा किती गाढ आहे हे दिसून येते. भुत्यासाठी रेणुका माता आणि भवानी माता एकच आहे. या दोन्ही देवीत तो कोणताही भेद मानत नाही. अंगात झगा, पायात विजार, डोक्यावर कवड्या गुंफलेली टोपी, गळ्यात कवड्यांची माळ आणि कमरेला कवड्यांचा पट्टा घातलेल्या भुत्याच्या एका हातात चिंध्यांनी बनविलेला मोठा पोत आणि दुस%yaa हातात तुणतुणे असते. डाव्या खांद्यावरून बुधळी लोंबत असते, तर उजव्या खांद्याला झोळी असते. गळ्यात देवीचा टाक असतो. अनवाणी, मळकट कपड्यातला, कवड्यांनी सजलेला भुत्या मुखाने सदैव देवीच्या आरत्या, गीतं गात असतो, तर कधी **अ**ga`**ह** केल्यास तो कथाही सांगतो. घटस्थापनेच्या (नवरात्राच्या) कालावधीत हे भुत्ये गावोगाव फिरून देवीचा महिमा गातात. लोक या उपासकाच्या पोतावर तेल टाकतात आणि घटात टाकलेली दक्षिणाही त्याला देतात. हे भुत्ये सहसा मराठा किंवा ब्राह्मण जातीतील असतात. भुत्या होण्यासाठी एक विशिष्ट प्रकारचा विधी पार पाडावा लागतो. हा विधी भोपे पार पाडतात. या देवीभक्तांमध्ये भुत्या म्हणजे सेवक आणि भोपे म्हणजे राजे होत.

### ❖ ६. भराडी :

कर्म वाईऽऽट,
वैतागी बांधला मठ

अशी डमरूच्या तालावर प्रबोधनाची वाणी फुलून येताना ज्यांनी सातत्याने पाहिली असेल, त्यांना भराडातल्या मार्मिकतेची जाणीव नक्कीच झाली असेल. ग्रामीण जीवनातील अनेक प्रश्नांना आपल्या गीतांमधून वाचा फोडणारा हा लोककलाकार आज खूपच विरळ झालेला आहे. आजच्या पिढीतल्या, विशेषत: ग्रामीण भागातील लोकांनाही भराडी कितपत माहिती आहे याबद्दल साशंकता आहे. एखादा कोणी पाल्हाळीक बोलत असेल तर म्हातारी माणसं ‘बंद कर तुझं भराड’ असं म्हणतात. त्यावरून भराड म्हणजे पाल्हाळ एवढाच अर्थ मनात येतो. पण ‘भराड’ हाही एक लोककलेचा प्रकार आहे, ही माहिती खूप कमी जणांना आहे. वासुदेव, पिंगळा, पोतराज, भुत्या, लावणी, शाहिरी, कीर्तन या कला आजही थोड्याबहूत फरकाने अधूनमधून का होईना पाहायला मिळतात. पण भराड ऐकायला मिळणे आजच्या घडीला किमान पश्चिम महाराष्ट्रात तरी दूरापास्तच आहे.

**भैरवोपासक :** भराडी हे श्री भैरवनाथाचे उपासक आहेत. नाथपंथाची दीक्षा घेऊन ते भैरवनाथाचे गुणगान करत भराड सांगत फिरतात. पूर्वी ते धोतरावरून नेसले जाणारे काचे बनवून उदरनिर्वाह करत. भराड्यांना डबरे गोसावी असेही संबोधले जाते.

❖ ७. **वाघ्या- मुरळी :**

महाराष्ट्राच्या आदर्श परंपरेत भर घालणा-या अनेक लोककला जनजीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या आहेत. पण या कलांमध्ये जेव्हा अंधश्रद्धेतून मानवी जीवनावर होणारा अन्याय डोकावतो, तेव्हा भारावून सोडणाऱ्या काही कलांच्या मुळाशी असणारा अन्यायकारक विचार मनाला टोचू लागतो. ‘वाघ्या-मुरळी’ हे लोककलावंत मनात असेच प्रश्नांचा डोंगर उभा करतात.

वाघ्या आणि मुरळी ही जोडी खंडोबाची उपासना करण्यासाठी आयुष्य वेचते. नवलाख पायरीच्या वर असणाऱ्या या जेजुरीच्या खंडोबाचं गुणगान गावोगावी घरोघरी भक्तिभावानं केलं जातं आणि याच भक्तीचा एक भाग म्हणून वाघ्या-मुरळीला बोलावून देवाचं जागरण घातलं जातं. महाराष्ट्रातल्या जवळजवळ सर्वच खेड्यांमध्ये हा कुळाचार पाळला जातो.

वाघ्या किंवा मुरळी सोडण्याचा एक ठरावीक विधी असतो. नवस बोलणारे आई-वडील चैत्र महिन्यात नवस पूर्ण करण्याचा मनोदय विशिष्ट अशा देवस्थानाच्या गुरवाला कळवतात. त्यानंतर एक तारीख व वेळ नक्की केली जाते, त्या दिवशी मुलाला / मुलीला वाजत-गाजत देवळात आणले जाते. खंडोबाच्या साक्षीने मुलाच्या गळ्यात वाघाच्या कातड्याची भंडाऱ्याची पिशवी अडकविली जाते व देवाला त्या मुलाचा स्वीकार करण्यासाठी साकडं घातलं जातं. देव त्या मुलाचा स्वीकार करतो हे गुरवालाच कळते व त्यानंतर ते मूल आयुष्यभरासाठी खंडोबाच्या मालकीचं होतं. खांद्यावर घोंगडं, गळ्यात वाघाच्या कातड्याची पिशवी आणि हातात घंट्यांची जोडी म्हणजेच घोळ असलेला वाघ्या रुबाबदार वाटतो. तर नऊवारी नेसून खंडोबाच्या नावाचा भंडारा कपाळावर लावणाऱ्या मुरळीची चपळाई कार्यक्रमात रंगत भरते. वाघ्या-मुरळीची जागरणं शुभकार्यानंतर घरोघरी आयोजित केली जातात. हे कार्यक्रम अगदी गोंधळासारखेच असतात. गोंधळात स्त्रिया नसतात आणि इथे मुरळी (स्त्री) असते हा एक महत्त्वाचा फरक आहे.

❖ ८. **शाहीर:**

तुणतुण्याला ताण देऊन डफावर थाप पडली की मराठी मन शहारून उठतं. नसानसातून शूरत्वाचा वारसा सळसळू लागतो दैदिप्यमान इतिहासाबद्दल अनन्यसाधारण अभिमान बाळगणारे मराठी मन पोवाड्यांमधील पराक्रमांच्या वर्णनाने भारावून जाते. शाहिरी ही संकल्पना जरी अन्य भाषेतून घेतली गेली असली, तरी तिचा गाभा मात्र मराठीपणाने रसरसलेला आहे. ही कला पूर्णत्वाने महाराष्ट्राच्या जीवनाशी एकरूप झालेली आहे. तिच्या अंतरंगातून

महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांचा इतिहास उलगडत जातो. वीरांच्या गाथा मांडताना शाहिरांचा डफ जसा कडाडून उठतो, तसाच तो पळपुट्यांवर तुच्छतेनं हसतो देखील. पण त्याचं हसण किंवा त्याचं कडाडणं हे सर्वस्वी अवलंबून आहे ते मराठी माणसाच्या भावनांवर. मराठी मन जसा विचार करत असेल, तसाच पोवाडा बोलत राहतो.

❖ ९. **भारूड :**

महाराष्ट्रातील लोककलांमध्ये ज्या लोककला आजही अखंडपणे व तेवढ्याच ताकदीने उभ्या आहेत, त्यापैकी भारूड ही एक महत्त्वाची कला. ग्रामीण महाराष्ट्रात तमाशाखालोखाल या कलेचे आकर्षण आहे. वार्षिक ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम गाथा पारायण, यात्रा किंवा इतर उत्सवांमध्ये भारूडाचे स्वतंत्रपणे आयोजन केले जाते. लोकमानस जिंकण्याची ताकद असणारी ही कला जेवढी रंगतदार आहे तेवढीच ती प्रबोधकही आहे, नाट्य, वक्तृत्व आणि संगीताच्या मिलाफातून रंगत जाणारे हे भारूड अध्यात्माच्या प्रसाराचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. संत एकनाथ हे या वैशिष्ट्यपूर्ण कलेचे जनक होत.

मध्यभागी बसलेला वीणेकरी त्याच्या एका बाजूला मृदंगवादक व दुस%yaa बाजूला पेटीवादक असतो व भोवताली पंधरा-वीस टाळकरी असतात. थोड्या-बहुत फरकाने कीर्तनासारखी भारुडाची बैठक बसते. सुरुवातीला 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठऽऽल श्री ज्ञानदेव तुकाराम' असा गजर होतो आणि 'विठोबा रखुमाई' चे भजन सुरू होते. रंगतदार सुरुवातीसाठी बराच वेळ हे भजन उत्साहाने गायले जाते आणि शेवटी रंगात आलेल्या श्रोत्यांना सोबत घेऊन 'पुंडलिक वरदे' चा सभामंडप दुमदुमून टाकणारा जयघोष होतो. उत्साह, लगबग, रंगतदार चाली, संगीत, खुसखुशीत निवेदन या भारुडाच्या जमेच्या बाजू असतात. भजन संपलं की निवेदक (भारूडकार) उभा राहतो आणि आपल्या श्रवणीय शैलीत लोकांच्या डोळ्यासमोर एक चित्र उभे करतो. भारुडाच्या सुरुवातीसाठी त्याला लोकांना-आपण एका गावात घडणारी नित्याची कथा ऐकतो आहोत याची-कल्पना द्यावी लागते. मग या गावाचा दिनk` म पहाटेपासून सुरू होतो. सडा-रांगोळी होते. पक्षांचा किलबिलाट, गुरांचे हंबरणे आणि अशा तजेलदार वातावरणात जात्यावर ओव्या गाणा%yaa महिला सुरात गाऊ लागतात.

सुंदर माझं जातं ग,
फिरतं बहुत...
ओव्या गाऊ कौतुके तु,
ये रे बा विठ्ठला...

भारुडात मध्ये-मध्ये लोकसंस्कृतीतल्या अशा गीतांची पेरणी केली जाते. भारूडांमध्ये वरवर पाहिले असता विनोद व मनोरंजन दिसते. पण ही गीते व अनुषंगाने येणाऱ्या कथा या 'रूपकात्मक' (रूपक अलंकाराने युक्त) असतात. बहुतांश भारूडांमधून भौतिक सुखांचा उपभोग घेत असतानाच, उपभोगांवर मर्यादा ठेवून परमार्थ कसा साधावा, याबाबतचे आध्यात्मिक मार्गदर्शन केले जाते.

एकूणच भारूड ही लोककला महाराष्ट्राच्या लोकजीवनातली एक समृद्ध, प्रभावी आणि प्रबोधक कला आहे आणि ही कला जोपासण्याचं कार्य अनेक कीर्तनकार, भारूडकार, संशोधक, अभ्यासक व लेखक मोठ्या हिरीरीने करत आहेत. ही आशादायक आणि समाधानकारक बाब आहे.

❖ १०. **तमाशा :**

तांबड्या फेट्यांचा हलता-डुलता सागर, शिट्ट्यांचा आवाज, हवेत तरंगणारे रुमाल आणि या साऱ्या वातावरणाला आपल्या ठेक्यात बांधून ठेवणारी ढोलकी, ढोलकीच्या तालावर थरथरणारी घुंगरं आणि घुंगरू बांधून नर्तन करणारी कलावंत - 'या बसा मंचकी राया' असे म्हणत महाराष्ट्राच्या मनामनातून डोलते आहे.

शेतात राबणाऱ्या रांगड्या गड्याचा रंगेलपणा बघावा तो तमाशातच. बेभान होऊन डुलण्याचा असा मोका वर्षाच्या जत्रेशिवाय गावगाड्याला मिळत नाही. म्हणूनच तमाशा आपल्या अढळपदावरून हालत नाही. मराठी मन जसं अध्यात्माला आपल्या जीवनात अढळपद देतं, तसं ते रंगबाजीचे, मनोरंजनाचे दरवाजेही बंद करीत नाही. महाराष्ट्राच्या याच रंगेल मनाला उधाण येतं ते फक्त तमाशा - लावणीच्या फडासमोरच. शतकानुशतके चालत आलेली ही लोककला, लोकपरंपरा आजच्या पिढीलाही मोहविते याचं महत्त्वाचं कारण म्हणजे तमाशाने मराठी मनाची नेमकी गरज ओळखली आणि त्या पद्धतीनं या कलेची रचना केली गेली.

तमाशाचा उगम विधिनाट्यापासून झाला असे अभ्यासकांनी नमूद केले आहे. विधिनाट्य आणि तमाशाच्या रचनेतही साम्य आढळून येते. विधिनाट्याच्या आणि तमाशाच्या रचनांवरून दोन्हीमध्ये असणारे साम्य व तमाशाच्या उगमा- विषयीच्या अभ्यासाला पुष्टी मिळते. त्याचबरोबर सातवहनांच्या राजवटीत चालत असणाऱ्या रतिनाट्याची रचना तमाशासारखीच वाटते, असेही काही अभ्यासकांनी नमूद केले आहे.

पूर्वीपासून प्रचलित असणा%yaa गोंधळ, मुरकी, शाहीरी अशा लोककलांमधून एकेक वैशिष्ट्य उचलून तमाशा ही एक वेगळीच रंगतदार लोककला जन्माला

आली. त्यासाठी शाहिरांनी आपल्या शृंगारिक लावण्या दिल्या, तर मुरकी, कोल्हाटीण अशा लोककलांनी तमाशाचं प्रमुख आकर्षण असणारी ‘नाची’ म्हणजेच नर्तकी तमाशाला दिली. नंदीवाल्याचा ढोल आणि कोल्हाटणीची ढोलकी या दोन्हींच्या मिश्रणातून तमाशाची ढोलकी तयार झाली. लोकमनाला भावलेली अशी एकेक अस्सल वस्तू जमा करत-करत बावनकशी तमाशा आकाराला आला आणि त्याने लोककलांच्या मांदियाळीचा लोकप्रियतेचा कळस गाठला.

❖ **गण-**

रंगमंचाचं पूजन झाल्यानंतर सर्व कलाकार रंगमंचावर येऊन तमाशा रंगतदार व्हावा म्हणून श्रीगणेशाला साकडं घालतात.

आधी गणाला रणी आणा।
नाही तर रंग पुन्हा सुना-सुना ।।धृ।।

म्हणत गणरायाला प्रथम मान दिला जातो. ह्याचा आशीर्वाद नसेल, तर पुन्हा सारा रंग सुना होऊन जातो अशी धारणा या कलावंतांमध्ये आहे.

❖ **गवळण:** –

गणानंतर गवळणींचा मेळा येतो. सा%yaa गवळणी सजून-धजून मथुरेच्या बाजारला निघालेल्या असतात. त्यांच्याबरोबर जुनी जाणती म्हणून एक मावशीही असते. मावशीचा वेश घेऊन वावरणारा हा कलावंत थोडीशी वेगळ्या धाटणीची भाषा बोलतो. त्यात तमाशाच्या मानाने सभ्य वाटणारे विनोद साधले जातात. बाजाराला जाणा%yaa या गौळणींच्या वाटेत पेंद्या आणि कृष्ण आडवा येतो. ‘गवळण’ म्हणून देवाची भक्ती करा, मगच तुमची वाट सोडू म्हणत पेंद्या त्यांना दम देतो आणि गवळणी सुरू होतात.

❖ **लावणी – रंगबाजी:-**

तमाशातला हा सर्वात रंगतदार भाग. कुठल्यातरी गावचा मारखाऊ सरपंच गावच्या जत्रेसाठी तमाशा ठरवायला जातो. तिथं त्याची गाठ नायकीणीशी पडते आणि दोघांमधल्या संवादाने हास्याचा सागर उसळतो. त्यानंतर लावण्या सादर केल्या जातात. मध्ये मध्ये विनोदांची पेरणी, तमाशा ठरविण्यासाठी दरातली घासाघीस या सर्वांमध्ये प्रेक्षक दंग होऊन जातो.

❖ **वगनाट्य:-**

सत्य घटनांवर आधारित किंवा काल्पनिक कथांचं नाट्यरूपांतर म्हणजे वगनाट्य होय. ‘विष्णू बाळा’ हे एक त्यातलं गाजलेलं वगनाट्य. ‘गाढवाचं लग्न’ हे काल्पनिक वगनाट्यही लोकप्रियता

मिळवून गेलं. ग्रामीण जीवनाशी संबंधित, नातेसंबंधावर आधारित, समकालीन राजकारणावर भाष्य करणारे - अशा विषयांवर बेतलेलं वगनाट्य रसिक जागा न सोडता पहाटेपर्यंत बघत राहतो व शेवटी मुजरा करून तमाशाची सांगता होते.

❖ **११ कीर्तन :**

‘कीर्तने वाचा पवित्र। कीर्तने होय सत्पात्र।
कीर्तने प्राणिमात्र। सुशील होती...।।

समर्थ रामदास स्वामींच्या या श्लोकातून कीर्तनाचा महिमा स्पष्ट होतो. महाराष्ट्र ही संत-महंतांची, वारकऱ्यांची भूमी आहे. या संस्कारमय ज्ञानतीर्थावर संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला व भागवत धर्म प्रसारकांनी ही इमारत तेजस्वी बनविली. संत तुकोबांच्या रूपाने भक्तिमार्गाचा कळस आणखी तेजाने चमकू लागला. धर्मापासून ते नित्यk` मांपर्यंत आणि सामाजिक प्रश्नांपासून ते मोक्षापर्यंत प्रत्येक गोष्टीत संत समाजाचे मार्गदर्शक झाले, आणि हे मार्गदर्शन करण्यासाठी ज्या साधनाचा सशक्त आधार त्यांना लाभला, ते म्हणजे कीर्तन. संशोधकांच्या मते - ‘कीर्तनाचा उगम उपनिषद काळात झाला-असा उल्लेख आढळत असला, तरी पुराणकाळात ही संस्था उदय पावली असावी. तर काही अभ्यासक कीर्तन परंपरा वैदिक काळापासून आहे असेही सांगतात.

नाचु कीर्तनाचे रंगी।
ज्ञानदीप लावू जगी।

असे म्हणत विश्वाला ज्ञानाची कवाडे खुली करून देणारी ही कला एवढ्या दीर्घ काळानंतरही तेवढीच रसपूर्ण आहे. खेडोपाड्यातून आजही अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केले जातात. या सप्ताहात महाराष्ट्रातले वेगवेगळे कीर्तनकार बोलवून प्रबोधनाचे कार्य केले जाते. रात्री होणा%yaa या भगवत भजनास पूर्ण गाव गोळा होतो. वक्तृत्व, कथा-कथन, एकपात्री, काव्य, संगीत या सर्वांचा सुंदर मिलाफ असणारी ही कला अवगत करणे ही तशी अवघड बाब आहे. पण अनेक वर्षे अविश्रांत अभ्यास आणि साधना करून कीर्तनकार झालेले लोक आपल्या श्रोत्यांच्या मनावर आपल्या ज्ञानाचा व सादरीकरणाचा ठसा उमटविण्यात यशस्वी होतात.

संत ज्ञानेश्वर माउली, संत नामदेव, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत चोखामेळा आदी संतांच्या अभंगांच्या अनुषंगाने भक्तिमार्ग सांगितला जातो, आध्यात्मिक मार्गदर्शन केले जाते, संसारापासून अलिप्त’ राहण्यास सांगितले जाते. संत नामदेव हे कीर्तन कलेचे प्रवर्तक मानले जातात, त्यांच्या या क्षेत्रातील अधिकार मोठा मानला जातो.

❖ **समारोप :**

लोककथा, लोककला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था हे आपल्या सांस्कृतिक जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. या तिन्ही घटकांचा अभ्यास केल्याने आपल्याला समाजातील विविधता, त्यांच्या कलेतील बारीक-सारीक तपशील, त्यांच्या आर्थिक पद्धती आणि त्यांचे अस्तित्व एकत्रितपणे कसे प्रकट होते हे समजते. या गोष्टींमध्ये एक सूक्ष्म संबंध आहे जो आपल्या समृद्ध आणि सशक्त ग्रामीण समाजाच्या निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. भारतीय संस्कृतीचा पाया हा विविधतेत एकता या तत्त्वावर उभारलेला आहे. ही विविधता ज्या तीन महत्त्वाच्या घटकांवर आधारलेली आहे ती म्हणजे **लोककथा, लोककला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था**. हे तीन घटक आपल्या सांस्कृतिक जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. ते केवळ समाजाच्या परंपरा आणि विचारविश्वाचे प्रतिनिधित्व करत नाहीत, तर समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेच्या घडणीतही महत्त्वाची भूमिका बजावतात. या तिन्ही घटकांचा अभ्यास केल्यास गावकुसातले जीवन, लोकांच्या आशा-आकांक्षा, कष्टमय संघर्ष आणि त्यातील सौंदर्य यांचे एक व्यापक चित्र उभे राहते.

लोककथा म्हणजे समाजाने अनुभवलेल्या घटना, मूल्ये आणि जीवनदृष्टी शब्दरूपात व्यक्त करणाऱ्या कथा. त्या लिहिलेल्या नसून बोलून पुढे जाणाऱ्या असतात. म्हणून त्यांना "जीवंत इतिहास" असेही म्हणतात. लोककथांमध्ये राजे-महाराजे, देव-देवता, नैतिक मूल्ये, चांगले-वाईट यांचे स्पष्टीकरण, बुद्धिमत्ता, संघर्ष आणि विजय असे अनेक घटक दिसतात.

लोककथा समाजाला अनेक प्रकारे आकार देतात.त्या म्हणजे

- लोकांना नैतिकता शिकवतात,
- कठीण परिस्थितीत योग्य निर्णय कसा घ्यावा याची दिशा देतात,
- सामाजिक एकात्मता निर्माण करतात,
- तरुण पिढीला परंपरेशी जोडून ठेवतात.

उदाहरणार्थ, तेनालीराम, विक्रम-वेताळ, संतांची चरित्रे किंवा महाराष्ट्रातील आदिवासी कथांना केवळ मनोरंजन म्हणून न पाहता, त्या समाजाच्या अनुभवसंपन्न विचारांची परंपरा म्हणून पाहावे लागते. लोककथांनीच अनेक मुल्यव्यवस्थांचे रक्षण केले आहे.

लोककला ही लोकजीवनाची सर्जनशील अभिव्यक्ती आहे. ती एखाद्या वर्गाची किंवा प्रदेशाची सांस्कृतिक ओळख सांगणारी कला आहे. भारतातील प्रत्येक प्रांतात वेगळ्या लोककला

दिसतात—महाराष्ट्रातील लावणी, गोंधळ, पोवाडे, वारलीचित्रकला; राजस्थानातील कठपुतळी कला; पंजाबचे भांगडा; बिहारची मधुबनी कला; कर्नाटकचे यक्षगान आणि इतर अनेक.

लोककला केवळ मनोरंजन नव्हे, तर

- सामाजिक बंधन दृढ करणारी,
- धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करणारी,
- समाजाच्या भावनांना अभिव्यक्त करणारी

परंपरा आहे.

प्रत्येक लोककलेच्या प्रकारात त्या प्रदेशातील लोकांचे श्रम, आनंद, दुःख, स्वप्ने आणि संघर्ष यांचे दर्शन होते. लावणीतून महाराष्ट्रातील स्त्रियांची सामाजिक वास्तवता दिसते; भजने आणि कीर्तनांमधून भक्तीची भावना प्रकट होते; तर वारली चित्रकलेत आदिवासींच्या निसर्गसहजीवनाचे दर्शन घडते.

लोककला एकात्मता आणि अभिमान वाढवणारी शक्ती आहे. त्यामुळे ती आपल्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक ठरते.

भारतीय समाजाचा मोठा भाग ग्रामीण जीवनावर आधारित आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था ही सांस्कृतिक जडणघडणीचा महत्त्वाचा आधार आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मुख्यत्वे—

- शेती,
- पशुपालन,
- हस्तकला,
- हातमाग,
- छोटे उद्योग,
- आणि बाजारपेठेतील देवाणघेवाण यांवर आधारित असते.

ग्रामीण अर्थव्यवस्था फक्त अन्नधान्य किंवा वस्तूनिर्मितीपुरती मर्यादित नसून ती लोककला आणि लोककथांच्या अस्तित्वालाही आधार देते. कलाकारांचे जीवन, सण-उत्सवांचे आयोजन, जत्रा, बाजार आणि हस्तकलेचे व्यवसाय या सर्व गोष्टी ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या बळावर उभ्या असतात.

उदाहरणार्थ

- वारली चित्रकला, कोरीवकाम, मातीच्या वस्तू, हातमाग उद्योग यामुळे हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह भागतो.

- जत्रा, पोवाडे, गोंधळ कार्यक्रम, कीर्तन इत्यादी लोककलांमुळे स्थानिक बाजारांना चालना मिळते.
- शेती ही लोककथांच्या अनेक भागांची प्रेरणा असते, जिथे नैसर्गिक शक्ती, पाऊस, पीक, जनावरांचे महत्त्व कथांमध्ये प्रकट होते.

सशक्त ग्रामीण अर्थव्यवस्था नसती तर लोककला आणि लोककथा दोन्हींचे अस्तित्व धोक्यात आले असते. लोककथा, लोककला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था हे एकमेकांना पूरक घटक आहेत. ते स्वतंत्र नसून परस्परावलंबी आहेत.

- लोककथा लोकांच्या विचारांची आणि जीवनदृष्टीची सांगड घालतात.
- लोककला त्या कथांना कलात्मक अभिव्यक्ती देतात.
- ग्रामीण अर्थव्यवस्था या दोन्ही गोष्टींच्या टिकाऊपणाला आर्थिक पाठबळ देते.

अशा रीतीने लोककथा आणि लोककला ग्रामीण समाजाशी घट्ट जोडल्या जातात. जत्रा, सण, वार्षिक उत्सव, नाटक, भजन-कीर्तन, नृत्य, हस्तकला या सर्व गोष्टी ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देतात. त्याच वेळी या आर्थिक क्रियांमुळे कलांना आणि परंपरांना आयुष्य मिळते. यामुळे या तिन्ही घटकांचे एकत्रित अस्तित्व समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते.

## संदर्भ :

१. मराठी कवितेचा उष:काल किंवा मराठी शाहीर - श्रीपाद महादेव वर्दे, संपादक : स. ग. मालशे, मुंबई मराठी साहित्य संघ. २. संस्कृतीच्या पाऊलखुणा - द. ता. भोसले, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
३. लोकसंस्कृतीचे उपासक - रा. चिं. ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
४. भारूड वाङ्मयातील तत्त्वज्ञान - डॉ. रामचंद्र देखणे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
५. वारी : स्वरूप आणि परंपरा - डॉ. रामचंद्र देखणे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
६. महाराष्ट्राची सांस्कृतीक लोककला - डॉ. रामचंद्र देखणे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
७. गोंधळ : परंपरा, स्वरूप आणि आविष्कार - डॉ. रामचंद्र देखणे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
८. महाराष्ट्रातील लोकनृत्ये - श्री. सदानंद राणे
९ . संत परंपरा आणि सांस्कृतिक प्रबोधन : डॉ. वि. रा. करंदीकर, शिव-पार्वती प्रकाशन - १९८६, नाशिक.

१०. आपली संस्कृती श्री माऊलीसुत प्रकाश रामदासी - २००२, कोथरुड, पुणे.
११. आपले सण, आपले उत्सव श्री. दा. कृ. सोमण, कॉन्सेप्ट बुक्स, पुणे - २००७.
१२. आपले सण, आपली संस्कृती श्रीकांत चौगुले, अविष्कार प्रकाशन, पुणे. आवृत्ती क्र. १२, २००८.
१३. कृषी संस्कृतीच्या पाऊलखुणा श्री. द. ता. भोसले, पद्मगंधा प्रकाशन.
१४. शोध मराठीपणाचा संपादक : अरुणा ढेरे, भूषण केळकर, दिनकर गांगल, ग्रंथाली - २००७.
१५. कालनिर्णय दिनदर्शिका, कालनिर्णय प्रकाशन, दादर, मुंबई.

- **Copyright & License:**
© Authors retain the copyright of this article. This work is published under the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY 4.0), permitting unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.